# गाण्यांतून मिळाला बाबूजींच्या आठवणींना उजाळा

## राजापुरात मैफल : श्रीधर फडकेंच्या 'फिटे अंधाराचे जाळे'ला भरभरून प्रतिसाद

**सकाळ वृत्तसेवा**

राजापूर, ता. २९ : संगीत क्षेत्रातील दिग्गज व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखल्या जात असलेल्या 'बाबूजीं'च्या सुरेल आणि विविधांगी गाण्यांनी राजापुरात फिटे अंधाराचे जाळे मैफल बहारदार झाली. सुधीर आणि श्रीधर फडके या पिता-पुत्रांनी संगीतबद्ध केलेल्या गाण्यांनी राजापूरकर मंत्रमुग्ध झाले.

शहरातील मित्रमेळा आणि रत्नागिरी येथील आसमंत संस्थेच्या संयुक्त विद्यमाने श्रीधर फडके यांची




राजापूर : 'फिटे अंधाराचे जाळे' कार्यक्रमात गाणे सादर करताना श्रीधर फडके आणि सहकारी.
(छायाचित्र : चारुदत्त नाखरे)

'फिटे अंधाराचे जाळे' ही संगीत मैफल झाली. राजापूर हायस्कूलच्या मैदानावर झालेल्या मैफलीचा प्रारंभ ग. दि. माडगूळकर लिखित आणि सुधीर फडके यांनी संगीतबद्ध केलेले 'देव देव्हाऱ्यात नाही', या गाण्याने झाली. माउलीच्या हरिपाठातील 'देवाचिये द्वारी उभा क्षणभरी' या अभंगातून माउलीचा गजर करण्यात आला. श्रीधर फडके यांनी गायलेल्या 'रूपे सुंदर सावळा गे माये, या अभंगाला रसिकांनी वन्समोअर दिला. शांता शेळके लिखित 'तोच चंद्रमा नभात, 'धुंदी कळ्यांना' आदी गाणीही त्यांनी सादर केली. कोकणातील निसर्गसौंदर्यासह कोकणी लोकांच्या स्वभाव वैशिष्ट्याचे मर्मबंध उलगडणारे 'फिटे अंधारे जाळे', या गाण्याने साऱ्यांना मंत्रमुग्ध केले. मध्यंतरानंतर श्रीधर फडकेंनी गायलेले गोव्यातील भाषेचा टच असलेले आणि प्रेमीयुगुलाच्या भावविश्वाचे पदर उलगडणारे 'गो माजे बाय तू', या गाण्याला प्रेक्षकांनी उचलून धरले.


पान २ वर ▶



# गाण्यांतून मिळाला बाबूजींच्या आठवणींना उजाळा



▶ पान १ वरून


समाजातील अपप्रवृत्तींवर प्रकाश टाकणाऱ्या 'त्या कोवळ्या फुलांचा बाजार पाहिला मी', ही गझल, तर शेतकऱ्यांच्या जीवनावर प्रकाशझोत टाकणारी कुसुमाग्रज यांची 'लुटून गेले कुंपण साऱ्या कणसामध्ये मोती', या गायलेल्या 'लिलाव' कवितेने साऱ्यांना अंतर्मुख केले. उत्तरोत्तर रंगलेल्या या मैफलीमध्ये श्रीधर फडके यांना सहगायिका शेफाली कुळकर्णी, कोरस दीपा सामंत आणि अजिंक्य पोंक्षे, बासरी प्रा. सचिन जगताप, तबला तुषार आग्रे, सिंथेसायझर वैभव फणसाळकर, पांडुरंग बर्वे आदींनी साथ दिली. निवेदन सुकन्या जोशी यांनी केले. तत्पूर्वी, अखिल भारतीय नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल वस्त्रहरणकार गंगाराम गवाणकर यांच्यासह नगराध्यक्षा मीना मालपेकर यांचा सत्कार करण्यात आला.